# मेंदीने भरले हात तुझे,

मेंदीने भरले हात तुझे, हाती असे पुष्पमालीका|
सप्तपदी चालण्या, आतुरता दिसे पाउला||
डोळ्यातील भाव गहीरे, स्वप्न सत्यात ग उतरे|
साथी जो मनाचा, संगी तयाच्या जीवन साजीरे||
जरी आतुरता जिवाची, तरी होय तगमग मनाची|
माहेराचे पाश सुटती, मधुबंध सासरचे खुणावती||
आसवांची संतत धार ही, ओसंडे नयनांचा किनारा|
मायेच्या पदरचा दूर जाता सहारा||
चांदवा जरी मावळे, परी सूर्य जगा उजळे|
जगरहाटी ही अशीच, जा सामोरी नवजीवना मोदभरे||

स्मिता देशपांडे

चि.सौ.कां. रैनास

' शुभाशिर्वाद '

मम्मी,डॅडी

(सौ.स्मिता व विजय देशपांडे)